नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०९/२०२६ (सोमवार)

.........................................................................................

## मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत 'उमरेडचा राजा' गणपती विसर्जन सोहळा शांततेत व यशस्वीरीत्या पार पडला

दिनांक २७/०९/२०२६ रोजी उमरेड शहरातील प्रसिद्ध 'उमरेडचा राजा' गणपतीच्या विसर्जन सोहळ्यादरम्यान मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विसर्जन मिरवणुकीच्या मार्गाची तसेच विसर्जनस्थळाची पाहणी केली.यावेळी अपर पोलीस अधीक्षक श्री. अनिल म्हस्के तसेच श्री मयंक माधव, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग हे उपस्थित होते. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी विसर्जन सोहळ्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पोलीस बंदोबस्ताची पाहणी करून संबंधित अधिकारी व अंमलदारांना आवश्यक सूचना दिल्या. मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियमन तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या उपाययोजनांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

'उमरेडचा राजा' गणपतीला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करत शांतता व सुव्यवस्था राखली. नागपूर ग्रामीण पोलीसांच्या नियोजनबद्ध बंदोबस्तामुळे आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे 'उमरेडचा राजा' गणपती विसर्जन सोहळा शांततेत, शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडला


उमरेड
चा
राजा


उमरेड
चा
राजा




## सार्वजनिक मस्क-या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण जिल्हयात गणेश मंडळ व डीजे चालक/मालकांच्या बैठका

**आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सार्वजनिक मस्क-या गणेशोत्सवाच्या पाश्र्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन रामटेक** :— सार्वजनिक मस्क-या गणेशोत्सवाच्या अनुषंगाने श्री. रमेश बरकते उपविभागिय अधिकारी रामटेक विभाग यांचे अध्यक्षतेखाली पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील मस्क-या गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी व आयोजक यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत पोलीस निरीक्षक, श्री. राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन रामटेक

तसेच श्री. भोजराज बडवाईक, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय रामटेक' यांची प्रमुख उपस्थिती होती.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— सार्वजनिक मस्कऱ्या गणेशोत्सवाच्या अनुषंगाने श्री. रमेश बरकते, उपविभागिय अधिकारी, रामटेक विभाग यांचे अध्यक्षतेखाली गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, आयोजक तसेच डीजे चालक व मालकांची संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत सहा. पोलीस निरीक्षक श्री किशोर शेरकी, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पारशिवनी यांच्यासह श्री. मिश्रा, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पारशिवनी, श्री. निखिल ढोले, प्रभारी मुख्याधिकारी, नगरपंचायत पारशिवनी तसेच श्री. अभिषेक वंजारी, सार्वजनिक बांधकाम विभाग प्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

**पोलीस स्टेशन सावनेर** :— पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील मौजा धापेवाडा येथील ग्रामपंचायत कार्यालयात सार्वजनिक मस्कऱ्या गणेशोत्सवाच्या अनुषंगाने गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीदरम्यान गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडून आगामी उत्सवाच्या कार्यक्रमाची रूपरेषा व नियोजनाची माहिती जाणून घेण्यात आली. तसेच नियोजित कार्यक्रमांच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली

**सदर बैठकांमध्ये शासनाने निर्गमित केलेले परिपत्रक तसेच विविध शासकीय निर्देशांबाबत गणेश मंडळांचे पदाधिकारी व आयोजक यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उत्सवाच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, शासनाच्या निर्देशांचे पालन करणे तसेच प्रशासनाने दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत उपस्थितांना सूचना देण्यात आल्या. यावेळी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सर्व सूचना व शासनाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करून उत्सव शांततेत व सुव्यवस्थित पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन केले. सदर बैठकीत पोलीस व महसूल प्रशासनाच्या वतीने गणेश मंडळांना आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**

## पोलीस स्टेशन रामटेक



## पोलीस स्टेशन पारशिवणी



**पोलीस स्टेशन सावनेर**



## चंदन वृक्ष चोरीचा गुन्हा उघड, दोन आरोपी अटक
## ३३.६० किलो चंदनाच्या गाभ्यासह ०४ लाख ९६ हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन नरखेड येथे दाखल अपराध क्रमांक ६०९/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं मधील मौजा सिंधी उमरी शेत शिवारातील चंदन वृक्ष चोरीचा गुन्हा उघडकीस आणुन एकुण २ आरोपींना अटक केले आहे. आरोपीतांकडुन ४ लाख ९६ हजार २०० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक २७/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील आरोपी **१) अनिस नरेश राजपूत, वय ३४ वर्षे, रा. घुबडमेट, ता. काटोल, जि. नागपूर २) रजनीकांत धुर्बेसिंग मारवाडी, वय ३२ वर्षे,**

**रा. गोंडखैरी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर** यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन नरखेड येथील मौजा सिंधी उमरी शेत शिवारातील चंदन वृक्ष चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली. सदर गुन्हयातील **दोन्ही आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.**

**पोलीसांनी आरोपीतांकडुन १) चोरीचे ४ चंदनाचे वृक्ष तोडून त्यामधून काढलेला चंदनाचा गाभा वजन ३३.६० किलो किंमती ३,९६,०००/—रूपये २) गुन्ह्यात वापरलेले टीव्हीएस एक्टीव्हा १२५ क्र. एम एच—४०/डी बी—९४९० किंमती १,००,०००/—रूपये ३) लाकडे कापण्यासाठी वापरलेले लोखंडी आरी किंमती १००/—रूपये व लोखंडी कुऱ्हाड किंमती १००/—रुपये असा एकूण किंमती ४,९६,२००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदर गुन्हा उघडकीस आणला आहे.**



# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
# १७ गोवंश जनावरांची सुटका, ११ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त
# बेला पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन बेला :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग — प्रभार नागपूर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री उमेश नासरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांच्या नेतृत्वात बेला पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीवर कारवाई करून १७ गोवंश जनावरांची सुटका केली. एकुण ११ लाख ५८ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक २७/०९/२०२६ रोजी बेला पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा चिखलापार ते सिर्सी रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान आयसर वाहन क्र. एम एच—३१/एफ सी—१०५५ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १७ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून आयसर वाहन क्र. एम एच—३१/एफ सी—१०५५ किंमती १०,००,०००/— रूपये आणि १७ गोवंश जनावरे किंमती १,५८,०००/— रूपये असा एकुण किंमती ११,५८,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी आरोपी आयसर वाहन क्र. एम एच—३१/एफ सी १०५५ चा चालक याच्या विरूध्द पोलीस स्टेशन बेला येथे कलम ११(१), (ड), (ई), (फ) प्राण्यांचा छळ**

**अधिनियम सहकलम ५ (अ), ९ महा. पशु सरक्षण अधिनियम सहकलम ११९ मपोका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०६ गुन्हे दाखल,

**दिनांक २७/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०६ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे प्रमोद हरीचंद्र रेवतकर, वय ३५ वर्षे, रा. वार्ड क्र ०५, सावरगाव याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी रविंद्र ग्यानीराम परतेती, वय ६५ वर्ष, रा. फुलझरी (संग्रामपुर) ता. रामटेक, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला आरोपी** निलेश जवाहरलाल जैस्वाल, वय ३८ वर्ष, रा. बेला, ता. उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत** आरोपी जितेंद्र पितांबरजी पडीया, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र १५, पहलेपार सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत आरोपी नामे १)** रोशन गणेश धारपुडे, वय ४० वर्ष, रा. खापा, ता. सावनेर, जि. नागपू**र २)** ईश्वर जागोजी वालदे, वय ३६ वर्ष, रा. खुबाळा, ता. सावनेर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २८८० मिली देशी दारू, १५ लिटर मोहाफुल दारू, ७० लिटर मोहाफुल सडवा असा एकुण ६०४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),**